प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी हे पद अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडे वर्ग करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसुल व वन विभाग

शासन निर्णय क्र. एमएफएस-२०१९/प्र.क्र.६२/फ-८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २२ मे, २०१९.

संदर्भ :- प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) म.रा.,नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-७(१)/आस्था-१/प्र.क्र.१०६/ १८-१९/११, दि.२५/०४/२०१९

प्रस्तावना :-

समुद्राच्या / खाडीच्या किनारपट्टीचे पुरापासून धूप तसेच नैसर्गिक आपत्ती जसे सुनामी, वादळ यांचेपासून कांदळवनाचे संरक्षण करते. किनारवर्ती भागातील जैव विविधता समतोल राखण्यामध्ये आणि प्रदूषण कमी करण्यामध्ये कांदळवनाचे अनन्य साधारण महत्व आहे. कांदळवनाचे पर्यावरणीयदृष्टया अनन्य साधारणा महत्व विचारात घेऊन,मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक ८७/२००६ मध्ये अंतरीम निर्णयात सूचना दिल्या होत्या. त्यानुसार राज्य शासनाने तटीय क्षेत्रातील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धनाकरिता राज्य स्तरावर सन २०१२ मध्ये कांदळवन कक्ष निर्माण करण्यात आलेला आहे.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे अधिनस्त प्रशासकीय अधिकारी-१ व कार्यालय अधिक्षकाचे-१ पद मंजूर असून, सदर कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कामे पार पाडत होते. तथापि प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांच्याकडे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कामाचा व्याप खूप कमी अल्याने शासन निर्णय क्रमांक एफडीएम-२०१९/प्र.क्र.१९/फ-२ दि. २७ मार्च, २०१९ अन्वये आहरण व संवितरण अधिकारी म्हणून असलेले अधिकार रद्द करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत सदरहू कार्यालयात विविध प्रकारची कार्यालयीन कामे हाताळण्यासाठी प्रशासकीय अधिकारी पद मंजूर करण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रस्तावित केल्यानुसार, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी हे पद अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडे वर्ग करण्यास खालील प्रमाणे शासन मान्यता प्रदान करीत आहे.

अ.क्र.	**ज्या कार्यालयातून पद वर्ग करण्यात येत आहे त्या कार्यालयाचे नांव**	**पदनाम व पदसंख्या**	**लेखाशीर्ष**	**ज्या कार्यालयात पद वर्ग करण्यात येत आहे त्या कार्यालयाचे नांव**	**पदनाम व पदसंख्या**	**लेखाशीर्ष**
१	२	३	४	५	६	७
१	प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर	प्रशासकीय अधिकारी (१ पद)	२४०६-०७६६	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई	प्रशासकीय अधिकारी (१ पद)	२४०६-०७६६

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०५२२१६४५४४२९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2019.05.22 16:49:49 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
७. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), म.रा. मुंबई/नागपूर.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई /नागपूर.
९. प्रशासकीय अधिकारी, कक्ष-१३, प्र.मु.व.सं. (व.ब.प्र.) म.रा.नागपूर यांचे कार्यालय.
१०.मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
११.प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक.
१२.वन विभागातील सर्व कार्यासने.
१३.निवड नस्ती (फ-८ कार्यासन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.३२.